**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे दि.०५ मे २०२१ रोजीचे परिपत्रकीय सूचनेनुसार Resolution Framework - 2.0 अंतर्गत वैयक्तिक व लहान व्यावसायिक (Individuals & Small Businesses) कर्जांच्या पुनर्बांधणी (Restructuring) बाबत बँकेचे धोरण –**

| अ.क्र. | बँकेचे धोरण | |
|---|---|---|
| १. | **पात्र कर्जदार** | a) फक्त कोव्हिड-१९ मुळे उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम झालेले कर्जदार.<br>b) दि.३१ मार्च २०२१ रोजी Standard Asset वर्गीकरणामध्ये असणारे कर्जदार.<br>c) सर्व वित्तीय संस्थांकडून फंडेड आणि नॉन फंडेड मर्यादासह घेतलेली कर्जे (Exposure) दि.३१ मार्च २०२१ रोजी रू.५०.०० कोटींपर्यंत असलेले कर्जदार.<br>d) Restructuring साठी कर्जदाराने प्रस्ताव सादर केलेनंतर बँकेने प्रस्ताव मान्य केलेल्या तारखेस (Date of Invocation) Standard Asset वर्गीकरणामध्ये असणारे कर्जदार. |
| २. | **पात्र नसणारे कर्जदार** | ▪ दि.३१ मार्च २०२१ रोजी रक्कम रू.५० कोटीपर्यंत Exposure असणारी सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग (MSME) अंतर्गत असणारे कर्जदार.<br>▪ शेती कर्जे.<br>▪ बँकेच्या सेवकांना दिलेली कर्जे. |
| ३. | **लागू असणारे कर्ज प्रकार** | **अ) व्यक्तिगत कर्जे –**<br>या कर्जप्रकारामध्ये पुढील कर्जांचा समावेश राहील –<br>▪ घर खरेदी, घर बांधणी, घर दुरूस्तीसाठी दिलेली कर्जे.<br>▪ वैयक्तिक वापराची वाहन कर्जे.<br>▪ वैयक्तिक कारणासाठी घेतलेली सोने तारण, स्थावर तारण इ. कर्जे.<br>▪ शैक्षणिक कर्जे.<br>▪ गृहोपयोगी साहित्य (Consumer Durable) खरेदी करण्यासाठीची कर्जे.<br>▪ सण, समारंभ इत्यादीसाठी दिलेली कर्जे. |

| अ.क्र. | | बँकेचे धोरण |
|---|---|---|
| | | **ब) लहान व्यावसायिकांची कर्जे :**<br>व्यक्तिगत कर्जे व पात्र नसणारे कर्जदार वगळता उर्वरीत सर्व (किरकोळ व घाऊक व्यापाऱ्यांसह) व्यावसायिक कारणांसाठी दिलेली कर्जे. |
| ४. | **महत्वाच्या बाबी** | i) बँकेस कर्ज पुनर्बांधणीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत बँक कर्जदारास लेखी स्वरूपात निर्णय कळवेल.<br>ii) ज्या दिनांकास कर्जदार व बँक कर्जांची पुनर्बांधणी करण्याच्या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करणेस / प्रस्तावास अंतिम स्वरूप देणेस मान्यता देतील व वरील नियमांत बसणाऱ्या कर्जांसाठी Resolution Plan कसा राहील हे ज्या दिवशी निश्चित होईल, त्यास Invocation Date (विनंती मान्य दिनांक) असे समजले जाईल.<br>iii) पुनर्बांधणी प्रस्तावाची अंमलबजावणी ही Invocation Date पासून ९० दिवसांचे आत करणेची आहे.<br>iv) कर्जखात्यांचे मंजूर केलेले Restructuring हे कोव्हिड-१९ च्या परिणामांमुळेच केले असल्याची खात्री करणेचे अंतिम अधिकार रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांना राहतील.<br>v) पुनर्बांधणीमध्ये कर्जाबाबत तडजोड करणे (compromise settlements) याचा समावेश होणार नाही. |
| ५. | **धोरण कार्यवाही पध्दत (Standard Operating Procedure-SOP)** | a) पात्र वैयक्तिक कर्जदार यांना परिशीष्ठ-अ नुसार कर्ज पुनर्बांधणीबाबत स्वतंत्र पत्राद्वारे कळविले आहे, त्याचेही अवलोकन करावे.<br>b) पात्र लहान व्यावसायिक कर्जदार यांना परिशीष्ठ-ब नुसार कर्ज पुनर्बांधणीबाबत स्वतंत्र पत्राद्वारे कळविले आहे, त्याचेही अवलोकन करावे.<br>c) परिशीष्ठ-अ मध्ये नमूद केलेप्रमाणे पात्र वैयक्तिक कर्जदार यांनी परिशीष्ठ-क नुसार विहीत नमुन्यामध्ये कर्जदार, सहकर्जदार व जामीनदार यांच्या सह्यांनिशी आवश्यक कागदपत्रांसह बँकेकडे दि.१५ जुलै २०२१ अखेर अर्ज करणे आवश्यक राहील.<br>d) परिशीष्ठ-ब मध्ये नमूद केलेप्रमाणे पात्र लहान व्यावसायिक कर्जदार यांनी परिशीष्ठ-ड नुसार विहीत नमुन्यामध्ये कर्जदार, सहकर्जदार व जामीनदार यांच्या सह्यांनिशी आवश्यक कागदपत्रांसह बँकेकडे दि.१५ जुलै २०२१ अखेर अर्ज करणे आवश्यक राहील. |

| अ.क्र. | | बँकेचे धोरण |
|---|---|---|
| | | e) अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे –<br>❊ **वैयक्तिक / नोकरदार कर्जदारांसाठी –**<br>▪ गत तीन वर्षांची आर्थिक पत्रके / माहे जानेवारी २०२१ पासून दरमहाची अद्ययावत सॅलरी स्लीप.<br>उत्पन्न / पगार ज्या खात्यात जमा होतो, त्या खात्यांचे पासबुक/ स्टेटमेंटची दि.०१ जानेवारी २०२१ पासूनची अद्ययावत प्रत.<br>गत तीन आर्थिक वर्षांचा फॉर्म क्र.२६ए.एस./१६ व आयकर विवरण पत्रके (करपात्र उत्पन्न असलेस).<br>▪ एकूण कर्जांचा विचार करता, बँक नियमांनुसार जादा तारण आवश्यक असल्यास त्याबाबतचा तपशील.<br>▪ कोव्हिड–१९ च्या दुसऱ्या लाटेमुळे उत्पन्नावर काय, कसा, किती परिणाम झाला? याचा सविस्तर तपशील.<br>▪ उत्पन्नामध्ये सुधारणा, वाढ होणेसाठी काय उपाययोजना केली आहे, यापुढे काय करणार आहे, याची माहिती.<br>▪ उत्पन्न कोव्हिड–१९ आधीच्या पातळीवर (पूर्ववत) कधी होईल, याची सविस्तर माहिती.<br>▪ एकापेक्षा जास्त कर्जखात्यांची पुनर्बांधणी करावयाची असल्यास प्रत्येक कर्जखात्यासाठी कर्जपरतफेडीसाठी असणारी मुदत, जास्तीत जास्त दोन वर्षे वाढविता येईल (कोणत्याही परिस्थितीत कर्जखाती एकत्रित करता येणार नाहीत). त्याप्रमाणे परतफेडीसाठी अपेक्षित हप्ता पध्दतीची मागणी करावी.<br>▪ कर्ज परतफेडीसाठी विश्रांती कालावधी/वाढीव मुदत आवश्यक असल्यास एकत्रित जास्तीत जास्त २ वर्षांचा विचार करावा.<br><br>❊ **लहान व्यावसायिक कर्जदारांसाठी –**<br>i) मागील दोन आर्थिक वर्षांची आयकर विवरणपत्रकांसह ऑडीटेड आर्थिक पत्रके. तसेच सन २०२०–२१ साठीचे टेंटेटीव्ह/ऑडीटेड नफा–तोटा पत्रक, ताळेबंद आयकर विवरणपत्रकासह.<br>ii) माहे ऑक्टोबर २०२० ते एप्रिल २०२१ या कालावधीतील जी.एस.टी. विवरणपत्राची प्रत (लागू असल्यास).<br>iii) माहे ऑक्टोबर २०२० ते एप्रिल २०२१ या कालावधीतील खरेदी व विक्री यांची मासिकनिहाय आकडेवारी.<br>iv) एकूण कर्जांचा विचार करता, बँक नियमांनुसार जादा तारण आवश्यक असल्यास त्याबाबतचा तपशील. |

| अ.क्र. | बँकेचे धोरण | |
|---|---|---|
| | | v) कर्ज पुनर्बांधणीसाठीचा प्रकल्प अहवाल (Project Report for Restructuring) मध्ये खालील बाबींचा तपशील असणे आवश्यक आहे -<br>• कोव्हिड-१९ च्या दुसऱ्या लाटेमुळे व्यवसाय व उत्पन्नावर काय, कसा, किती परिणाम झाला? याचा सविस्तर तपशील.<br>• व्यवसाय व उत्पन्नावर झालेला परिणाम सौम्य, मध्यम अथवा तीव्र असल्याची माहिती.<br>• व्यवसाय व उत्पन्न यामध्ये सुधारणा, वाढ होणेसाठी काय उपाययोजना केली आहे, यापुढे काय करणार आहे, याची माहिती.<br>• व्यवसाय व उत्पन्न कोव्हिड-१९ च्या आधीच्या पातळीवर (पूर्ववत) कधी होईल, याची सविस्तर माहिती.<br>• एकापेक्षा जास्त कर्जखात्यांची पुनर्बांधणी करावयाची असल्यास प्रत्येक कर्जखात्यासाठी कर्जपरतफेडीसाठी असणारी मुदत, जास्तीत जास्त दोन वर्षे वाढविता येईल (कोणत्याही परिस्थितीत कर्जखाती एकत्रित करता येणार नाहीत). त्याप्रमाणे परतफेडीसाठी अपेक्षित हप्ता पध्दतीची मागणी करावी.<br>• कर्ज परतफेडीसाठी विश्रांती कालावधी/वाढीव मुदत आवश्यक असल्यास एकत्रित जास्तीत जास्त २ वर्षांचा विचार करावा.<br>• कर्ज परतफेडीसाठी अपेक्षित वाढीव कालावधीपर्यंतची प्रोजेक्टेड आर्थिक पत्रके तसेच या अनुषंगाने गृहीत धरलेल्या बाबींचा तपशील.<br>vi) भागीदारी फर्मच्या बाबतीत भागीदारीमध्ये कोणताही बदल नसलेबाबतचे सर्व भागीदारांच्या सह्या असलेले घोषणापत्र आणि भागीदारी नोंदणी दाखला.<br>vii) कंपनीच्या बाबतीत कर्ज पुनर्बांधणीबाबत व सर्व कागदपत्रांवर सह्या करण्याचे अधिकार असल्याचे संचालक मंडळ ठरावाची प्रत व कंपनीच्या मेमोरॅण्डम ॲण्ड आर्टिकल्स ऑफ असोसिएशन मध्ये कोणताही बदल नसलेबाबतचे घोषणापत्र देणे बंधनकारक राहील. तसेच सर्व कागदपत्रांवर कंपनीचे कॉमन सील उमटविणे बंधनकारक राहील. |

| अ.क्र. | बँकेचे धोरण | |
|---|---|---|
| ६. | **कर्ज पुनर्बांधणी अंमलबजावणी** | i) बँकेने कर्ज पुनर्बांधणी प्रस्ताव मान्य केल्यास कर्जदारास कर्ज पुनर्बांधणी मंजूरीपत्र देण्यात येईल. या मंजूरीपत्रातील नमूद सर्व अटी व शर्तींची पूर्तता कर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.<br><br>ii) मूळ कर्ज मंजूरीपत्रातील अटींची पूर्तता व कर्ज वितरणावेळी एक्झिक्युट केलेले तारणगहाणखत, वचनचिठ्ठी, कर्ज रोखा, हायपोथिकेशन ॲग्रीमेंट, जामिनकी बॉण्ड... इ. (सेकंड पार्टमधील सर्व करारपत्रे) कागदपत्रांची कायदेशीरता कर्जांच्या पुनर्बांधणीनंतर कर्जपरतफेडीपर्यंत वैध (कायम) राहतील, याबाबत कर्ज पुनर्बांधणी मंजूरीपत्रानुसार बँकेच्या पॅनेलवरील वकिलांच्या सल्ल्याने रक्कम रू.५००/- च्या जनरल स्टॅम्पवर नोटराईज्ड ॲग्रीमेंट करणेत येईल. कर्ज पुनर्बांधणी केलेनंतर स्टॅम्प ड्युटी भरणे आवश्यक असल्यास, ती कर्जदार यांनी भरणे बंधनकारक राहील.<br><br>iii) वरीलप्रमाणे नोटराईज्ड ॲग्रीमेंट झालेनंतर कर्ज पुनर्बांधणी मंजूरीपत्रानुसार मंजूर विश्रांती कालावधी, वाढीव कर्ज कालावधी तसेच एकूण मुद्दल येणेबाकी ठरविताना पुनर्बांधणीवेळी असणारी मुद्दल येणेबाकी + येणे व्याज + इतर येणे रक्कमा विचारात घेऊन परतफेड हप्ता निश्चित करणेत येईल व त्यानुसार सुधारीत कर्ज परतफेड तक्ता (Revised Loan Repayment Schedule) तयार केला जाईल. सुधारीत कर्ज परतफेड तक्ता (Revised Loan Repayment Schedule) नुसार कर्ज परतफेड तपशील मान्य असलेबाबत कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार यांनी सुधारीत कर्ज परतफेड तक्त्यावर सह्या करणे आवश्यक राहील.<br><br>iv) पुनर्बांधणी प्रस्ताव मंजूरीनुसार वरीलप्रमाणे केलेले बदल कर्जदारांनी त्यांच्या आर्थिक पत्रकांमध्ये केलेबाबत घोषणापत्र बँकेकडे सादर करणे आवश्यक राहील.<br><br>v) वरीलप्रमाणे कार्यवाही कर्ज पुनर्बांधणी मंजूरीपत्र दिनांकापासून ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक राहील. ही पूर्तता झाल्यावरच कर्ज पुनर्बांधणी प्रस्तावाची अंमलबजावणी झाली, असे समजण्यात येईल.<br><br>vi) वरीलप्रमाणे मुदतीत पुनर्बांधणी प्रस्तावाची अंमलबजावणी झाली नाही तर, सदरचा कर्ज पुनर्बांधणी प्रस्ताव रद्द होईल व कर्जदार यांना मूळ कर्ज मंजूरीपत्रानुसार कर्ज परतफेड करणे बंधनकारक राहील. |
| ७. | **तक्रारींबाबत** | कर्ज पुनर्बांधणी संदर्भात काही तक्रार असेल तर कर्जदार यांनी याबाबतची लेखी तक्रार संबंधित शाखेच्या व्यवस्थापक यांचेकडे सादर करावयाची आहे व त्याबाबतची रितसर पोहोच घेणेची आहे. तक्रारीबाबतचा निर्णय संबंधित कर्जदाराला त्याचा तक्रार अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळविणेत येईल. |

| अ.क्र. | | बँकेचे धोरण |
|---|---|---|
| ८. | **पुनर्बांधणी खात्यांची माहिती प्रसिध्दीकरण (Disclosure)** | Restructuring केलेल्या कर्जखात्यांची माहिती बँकेच्या वार्षिक अहवालामध्ये 'Notes to Account' अंतर्गत प्रसिध्द करणेत येईल. |
| ९. | **पुनर्बांधणी कर्जखात्यांच्या दर्जाबाबत (Credit Reporting)** | Restructuring केलेल्या कर्जखात्यांची अंमलबजावणी झालेनंतर क्रेडीट इन्फर्मेशन कंपन्यांना बँकेमार्फत सदर कर्जांचा Status ‘Restructured due to COVID-19’ असा कळविला जाईल. क्रेडीट इन्फर्मेशन कंपन्यांच्या धोरणानुसार अशा कर्जदारांची Credit History निश्चित केली जाईल. |